www.lokrakshanay.com
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-191 • Wednesday, 13 December 2023 •Pages-04 •Rs.2/-

**अनमोल विचार**

"माणसाला त्याच्या ध्येयात यशस्वी होण्यासाठी, स्वतःवर विश्वास ठेवणे खूप महत्वाचे आहे.."

## लक्षवेधी

### रामसेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित !- केंद्र सरकार

**नवी दिल्ली** : रामसेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे, अशी माहिती केंद्रीय संस्कृतीमंत्री जी. किशन रेड्डी यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. मंत्री रेड्डी यांनी यात पुढे म्हटले आहे की, रामसेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याचा कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही. स्मारक आणि स्थळ यांची घोषणा 'प्राचीन स्मारक आणि पुरातात्विक स्थळ अन् अवशेष अधिनियम, १९५८ चे कलम ४' अंतर्गत केली जाते.

### मंदिरांच्या भूमीवरील अतिक्रमणांचे अन्वेषण करा ! - आंध्रप्रदेश साधू परिषद

**आंध्रप्रदेश** : हिंदु मंदिरांच्या अतिक्रमण करून बळकावलेल्या भूमीविषयी अन्वेषण करण्याची मागणी 'आंध्रप्रदेश साधू परिषदे'ने केली. यासाठी महसूल आणि अंमलबजावणी संचालनालयाच्या अधिकार्यांसह एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात यावी, अशी मागणी 'आंध्रप्रदेश साधू परिषदे'चे अध्यक्ष स्वामी श्रीनिवासानंद यांनी केली. हिंदु मंदिरांच्या भूमींवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी परिषदेने पोंदुरू येथे 'हिंदु धार्मिक संमेलन' आयोजित केले होते.

### तेलंगणातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत जारी; मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी दिला आदेश

**नवी दिल्ली** : निवडणूक आचार संहितेचे कारण देऊन निवडणूक आयोगाने अडवून ठेवलेली तेलंगणातील शेतकऱ्यांची रयथु बंधु योजनेतील निधीची रक्कम जारी करण्याचा आदेश तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे. रेड्डी यांनी सोमवारी हैदराबाद येथे कृषी विभागाची उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी हा आदेश जारी केला. यावेळी बोलताना रेड्डी यांनी स्पष्ट केले की, अधिकाऱ्यांनी सोमवारपासून हा निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करावी. कोणत्याही शेतकऱ्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी असेही ते म्हणाले.

### आधी खासदारकी गेली, आता राहतं घरही गेलं! महुआ मोईत्रा यांना सरकारी निवासस्थान रिकामं करण्याची नोटीस

**नवी दिल्ली** : एकीकडे तृणमूल काँग्रेस नेत्या महुआ मोईत्रा यांची 'कॅश फॉर क्वेरी' प्रकरणात गेल्या शुक्रवारी त्यांची लोकसभेची खासदारकी रद्द करण्यात आली. आता महुआ मोईत्रा यांना घर रिकामे करण्याची नोटीसही देण्यात आली आहे. लोकसभेतून हकालपट्टी झाल्यानंतर आता त्यांना त्यांचे सरकारी निवासस्थान रिकामे करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. याआधी महुआ मोइत्रा यांनी लोकसभेची खासदारकी रद्द करण्याच्या विरोधात गेल्या सोमवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी महुआ मोइत्रा यांच्या हकालपट्टीचा प्रस्ताव मांडला, त्याला सभागृहाने आवाजी मतदानाने मंजुरी दिली.

### नेहरुंनी देशासाठी आयुष्य वेचलं, तुरुंगवास भोगला; राहुल गांधींचा अमित शाह यांच्यावर पलटवार

**नवी दिल्ली** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावर संसदेला संबोधित केले. यावेळी त्यांनी काश्मीरसाठी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना जबाबदार धरले.या वक्तव्यानंतर अमित शाह काँग्रेसच्या निशाण्यावर आले आहेत. याबाबत खासदार राहुल गांधी यांनी पलटवार करत अमित शाह यांना इतिहास माहीत नसल्याची टीका केली.संसदेबाहेर मीडियाशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, जवाहरलाल नेहरुंनी या देशासाठी आयुष्य दिले. त्यांनी अनेक वर्षे तुरुंगवास बोगला. अमित शाह यांना इतिहास माहीत नाही. ते फक्त मुख्य मुद्दे वळवण्याचा प्रयत्न करतात.

### डीके शिवकुमार आणि तुम्ही मिळालेले आहात; संसदेत खर्गेंनी आपल्याच उपमुख्यमंत्र्यांवर आरोप केले

**नवी दिल्ली** : संसदेच्या कनिष्ठ सभागृहात आज विचित्र प्रसंग पहायला मिळाला. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांनी काँग्रेसचे चाणक्य मानले जाणारे कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यावर टीका केली. भाजपा खासदार सुशील कुमार मोदी यांनी खर्गेंना कर्नाटकातील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील जात जनगणनेवरून असलेल्या मतभेदांवर छेडले होते. जम्मू काश्मीरवरील दोन विधेयकांवरील चर्चेवेळी मोदींनी खर्गेंना डीके शिवकुमारांचे नाव घेऊन प्रश्न विचारला होता. तुमचे सरकार जाती सर्वेक्षणाचा अहवाल कधी जाहीर करणार असा सवाल मोदी यांनी विचारला होता.

### मुलानं मुलीला पळवून नेलं अन् गावकऱ्यांनी आईची काढली नग्न धिंड, कर्नाटकातील धक्कादायक घटना

**नवी दिल्ली** : लाजिरवाणी आणि संतापजनक घटना कर्नाटकातील बेलगी जिल्ह्यातील छोट्याश्या गावात घडली. मुलानं मुलीला पळवून नेलं म्हणून ग्रामस्थांनी तरूणाच्या आईला वीजेच्या खांबाला बांधून मारहाण केली. संतप्त गावकरी इथेच थांबले नसून त्यांनी त्या माऊलीची नग्न अवस्थेत धिंड देखील काढली. जमावानं महिलेच्या घराची तोडफोड केली आणि तिला नाहक त्रास दिला. कर्नाटकातील वंटामुरी गावात घडलेल्या या भयावह घटनेनंतर गावातील काही कुटुंबीयांनी स्थलांतराचा पर्याय निवडला.

### 'काँग्रेस असेल तर Money Heist ची काय गरज...'; धीरज साहूंवरून नरेंद्र मोदींचं टीकास्त्र

**नवी दिल्ली** : झारखंडचे काँग्रेस खासदार धीरज साहू सध्या चर्चेत आहेत. मात्र, धीरज हे कोणत्याही राजकीय कृतीमुळे नाही तर त्याच्या काळ्या पैशाच्या कमाईमुळे चर्चेत आहे. धीरज साहू यांच्या घरावर छापेमारी करताना आयकर विभागाने आतापर्यंत 351 कोटी रुपयांची रोकड जप्त केली असून नोटांची मोजणी सुरू आहे.याच दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा या मुद्द्यावर काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला आहे. भाजपाने ट्विटवर शेअर केलेला एक व्हिडीओ मोदींनी रिट्विट केला आहे. यासोबत 'भारतात Money Heist कल्पनेची काय गरज आहे, जेव्हा तुमच्याकडे काँग्रेस पक्ष आहे, ज्यांचं Heist 70 वर्षांपासून प्रसिद्ध आहे' असं म्हटलं आहे.

# जुन्या पेन्शनसंदर्भात राज्य शासन सकारात्मक



## निवडणुकीपूर्वी घेणार निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन

**■नागपूर। यश सावंत,**

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात राज्य सरकारने तीन सदस्यांची समिती स्थापन केली होती. समितीने आपला अहवाल राज्य सादर केला आहे. जुन्या पेन्शनसंदर्भात राज्य शासन सकारात्मक असून येत्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी विधान परिषदेत दिले. विधान परिषदेत नियम १०१ अन्वये, जुन्या पेन्शनसंदर्भात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित मुद्यावर सरकारतर्फे माहिती देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्र सरकारस्तरावर सुध्दा वेगळा विचार सुरु आहे. कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतन, महागाई भत्ता यासंदर्भात केंद्र सरकारने वाढ केल्यानंतर राज्य सरकार सुध्दा त्याच पध्दतीने वाढ करत असते.

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्र सरकारने निर्णय घेतल्यास त्याच धर्तीवर राज्यात सुध्दा निर्णय घेण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सुबोधकुमार, के. पी. बक्षी आणि सुधीर श्रीवास्तव या तिघांची समिती स्थापन केल्यानंतर त्या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. त्याचबरोबर देशातील ज्या राज्यात जुन्या पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यात आला आहे, त्याची माहितीही मागविण्यात आली आहे. ती माहिती आल्यानंतर त्याबाबतचा अभ्यास करण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेबाबत राज्य सरकार सकारात्मक असून येत्या विधानसभा निवडणुकीपूर्वी याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिले.

## चुकीला माफी नाही! रेशन धान्य विकणाऱ्यांना बसणार लगाम, हिवाळी अधिवेशनात मोठा निर्णय

**■नागपूर। सचिन कदम,**

'रेशन धान्याची मोठ्या प्रमाणात खुल्या बाजारात विक्री होते. गरज नसतानाही तांदूळ लाभार्थ्यांना वितरित केला जातो. हाच तांदूळ खुल्या बाजारात विकला जातो. राज्यात वेगवेगळ्या भागांत अशा घटना पुढे आल्या आहेत', असा मुद्दा आमदार यशोमती ठाकूर यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. खुल्या बाजारात रेशन धान्याची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले. गोंदिया जिल्ह्यात शासन मान्यतेविना तांदळाची उचल केल्याचा मुद्दा आमदार जयंत पाटील



यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. रेशन दुकानात मिळणाऱ्या तांदळाचा दर्जाही निकृष्ट दजार्चा असतो. कुठेही तपासणी केली जात नाही. ७० ते ८० टक्के तांदूळ अपात्र ठरेल, अशी स्थिती आहे. धान्य वाहतूक करण्यातही अतिरिक्त खर्च केला जातो, याकडे पाटील यांनी लक्ष वेधले. पूर्व विदभार्तील जिल्ह्यात तांदूळ पिकतो. राज्यातील गरजेनुसार त्याची निर्यात केली जाते. मार्चपासूनच गोंदियाचा सीएमआर नगरला जोडण्यात आला होता. ८६ हजार क्विंटलची आवश्यकता होती. तांदूळ बरोबर वितरित झाला. इथे कुठेही तक्रार आली नाही. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून गुणवत्तेची तपासणी करण्यात येते, असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. पोलिसांचे गुन्हे दाखल झाले आहे. कडक कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. धान्य वितरणात दलाल सक्रिय होतात. राज्याच्या तिजोरीवर भार येत आहे. सुतळी खरेदीतही भ्रष्टाचार होतो. वाढलेला भ्रष्टाचार केव्हा थांबणार, असा मुद्दा आमदार नाना पटोले यांनी उपस्थित केला.

## आमच्या हातात दंडूके, सरकारला पायाखाली तुडवू शकतो, भुजबळांनाही पाहून घेऊ : मनोज जरांगे



**■बीड ।दिगंबर जाधव,**

जिल्ह्यातील धारूर शहरातील मोंढा मैदानावरील मनोज जरांगे यांची सभा होत असून, पुन्हा एकदा त्यांनी आपल्या सभेतून सरकार आणि मंत्री छगन भुजबळांवर हल्लाबोल केला आहे. तर, आमच्या हातात दंडूके आहे, मराठा समाज सरकारलाही पायाखाली तुडवू शकतो आणि भुजबळांमध्ये किती दम आहे पाहून घेऊ, असे वक्तव्य जरांगे यांनी या सभेत केले आहे. त्यामुळे, त्यांच्या याच वक्तव्यावर आता भुजबळ काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे. दरम्यान, यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, त्याचं ऐकून मराठ्यांना आरक्षण दिले जाणार नसेल, तर गाठ मराठ्यांसोबत आहे. एकदा आरक्षण मिळू द्या, मग मी त्याच्याकडे बघणार आहे. खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांचा देखील आरक्षण मिळाल्यावर हिशोब करणार आहे. गोळीबार, लाठीमार होऊन देखील आंदोलक अजून मागे हटलेले नाहीत. 307 सारखे गंभीर गुन्हे आपल्यावर दाखल केले. पहिल्यांदा एवढं निर्दयी आणि निष्ठुर सरकार पाहिलं. सरकार किती लोकांना अडकवणार आहे. लक्षात ठेवा 6 कोटी मराठा आहे, असे जरांगे म्हणाले. पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, ₹छगन भुजबळ यांचे ऐकून अन्याय करायचा असेल, तर सरकारला मराठा समाज सोडणार नाही. छगन भुजबळमध्ये किती दम आहे, हे आपण पाहून घेऊ. मराठा आरक्षणाचे पुरावे असतानाही आरक्षण दिले नाही.

## दिशा सालियान आत्महत्या प्रकरणाची पुन्हा चौकशी होणार, एसआयटी स्थापनेचे निघाले आदेश



**■मुंबई ।नितीन देवळेकर,**

राज्य सरकारकडून मुंबई पोलिसांना एसआयटी स्थापन करण्याचे लेखी आदेश देण्यात आले होते.त्यानंतर तत्काळ कार्यवाही झाली असून मुंबई पोलीस आयुक्तांनी एसआयटी स्थापन केली असून तपास अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. मुंबई पोलीस आयुक्तांनी दिशा सालियान आत्महत्या प्रकरणी फेरतपासाचे आदेश दिले आहेत. अप्पर पोलिस आयुक्त उत्तर विभाग राजीव जैन हे एसआयटीचे नेतृत्त्व करणार आहेत. गेल्या हिवाळी अधिवेशनात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिशा सालियान मृत्यू प्रकरणी SIT चौकशीचे आदेश दिले होते. अखेर आज मुंबई पोलिसांना एसआयटीसंदर्भात लेखी आदेश देण्यात आले आहेत. मुंबई पोलिस आयुक्तांनी दिशा सालियान मृत्यु प्रकरणी फेरतपासाचे आदेश दिले आहेत. परिमंडळ 11 चे पोलीस उपायुक्त अजय बन्सल आणि मालवणी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक चिमाजी आढाव यांच्या नेतृत्वात प्रकरणाचा तपास करण्यात येणार आहे.

त्याशिवाय, अप्पर पोलीस आयुक्त उत्तर विभाग राजीव जैन हे टीमचं नेतृत्व करणार आहेत. यामध्ये क्राईम ब्रांच आणि इतर युनिट्सच्या तज्ञ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. दिशा सालियान हीने आत्महत्या केली असल्याचे मुंबई पोलिसांनी आपल्या आधीच्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले होते.

## मुंबई महानगरपालिकचे ऑडिट करा म्हटल्यावर झोंबायचे कारण काय? उदय सावंत यांचा सवाल



**■मुंबई ।विशाल कारंडे,**

मुंबई महानगरपालिकेच्या गेल्या २५ वर्षांचे ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावरून आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. मुंबई महापालिकेसोबतच नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, ठाणे या सर्व महापालिकांचेही ऑडिट करा, अशी मागणी ठाकरेकडून होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुंबई महानगरपालिकचे ऑडिट करा म्हटल्यावर झोंबायचे कारण काय? असा सवाल मंत्री उदय सामंत यांनी ठाकरे गटला केला आहे. सभागृहाच्या बाहेर या सर्व गोष्टी आहेत. बीएमसीचे ऑडिट करावे, असे सांगितल्यानंतर ऐवढे झोंबायचे काही कारण नाही ना? मुंबईचे ऑडिट योग्य आहे की अयोग्य आहे. याची श्वेतपत्रिका आम्ही सरकार म्हणून जाहीर करणार आहोत. एवढ्या कश्याला मिर्चा झोंबल्या पाहिजेत. ज्यावेळी, पुणे, नागपूर, ठाणे, करायची असेल तेव्हा करू. कोव्हिड काळात जे घोटाळे झाले आहेत. ते आपल्यासमोर आहे, त्यावर मी शेरे मारलेले नाहीत. त्यामुळे कुठेही काही झाले तरी ही महानगरपालिका तपासा आणि ठाणे तपासा, अस म्हटलं जातंय. तर आम्ही तपासांच्यावेळी तपासू. जी आता तपासायचे ठरवलेले आहे. ते पहिले तपासू, असे उदय सामंत म्हणाले. मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारासंदर्भात उदय सामंत म्हणाले, काल जी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ती समिती आर्थिक व्यवहाराची सविस्तर चौकशी करेल आणि श्वेतपत्रिका काढण्याचे देखील काल झालेल्या चर्चेनंतर घेतलेला आहे.

## 'एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय माझा होता.' - देवेंद्र फडणवीस



**■मुंबई ।भावना जैन,**

एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करायचे हा निर्णय माझा होता. हा काही पक्षाच्या वरिष्ठांनी घेतलेला निर्णय नाही. मी प्रस्ताव मांडला होता. वरिष्ठांनी कालांतराने तो मान्य केला. मी मुख्यमंत्री होणार नाही हे मला पहिल्या दिवसापासून माहिती होते. पण मी उपमुख्यमंत्री होईन हे शेवटच्या दिवसापर्यंत मला माहिती नव्हते. पक्षाने मला सांगितले की सरकार चालवायचे आहे. तुम्ही उपमुख्यमंत्री व्हा. हा माझा सन्मानच आहे, असा दावा उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. दरम्यान फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, पक्षाला जेव्हा वाटेल, तेव्हा मला केंद्रात बोलवतील. ज्यांना वाटतेय की फडणवीस राज्यातून दिल्लीत गेले म्हणजे 'बला' टळली त्यांना मी सांगेन, तुम्ही देव पाण्यात ठेवून बसलात, तरी 'बला' काही टळत नाही, असे म्हणत महाराष्ट्रात राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. माझ्या पक्षाने उद्या मला सांगितले की तुमचे काम संपले, आता तुम्ही घरी बसा, तर मी घरी बसेन. कारण मी जे काही आहे, ते माझ्या पक्षामुळे आहे. माज्या नावामागचे भाजप काढून टाकले तर मी शून्य आहे. त्यामुळे पक्ष जे सांगेल, ते मी करेन असे म्हणत आपण पक्षादेश पाळत काम करणार असल्याचे स्पष्ट केले.

## ..आता भारतात ट्रकमध्ये वातानुकूलित केबिन अनिवार्य, केंद्रीय मंत्रालयाकडून अधिसूचना जारी



**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

ट्रक चालवत लांब पल्ला गाठताना ड्रायव्हर्सची चांगलीच दमछाक होते. रस्त्याचा अंदाज आणि वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना पुरते बारा वाजतात. त्यात लांब पल्ल्याचा प्रवास करताना इंजिन चांगलंच तापतं आणि केबिनमध्ये बसलेल्या चालकांना गाडी चालवताना त्रास होतो. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक पाऊल उचलण्याचं ठरवलं होतं. ड्रायव्हर्सचा थकवा कमी करण्यासाटठी सर्व ट्रक वातानुकूलित करण्याचा विडा त्यांनी उचलला होता. त्यांच्या या प्रयत्नांना लवकरच यश येईल असं म्हणायला हरकत नाही. केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक अधिसूचना जारी करत सांगितलं आहे की, 1 ऑक्टोबर 2025 रोजी किंवा त्यानंतर उत्पादित केलेल्या एन२ आणि एन३ श्रेणीतील वाहनांच्या केबिनमध्ये वातानुकूलित यंत्रणा बसवली आहे. तसेच एअर कंडिशनिंग सिस्टम असलेल्या केबिनची चाचणी भारतीय मानक संस्थेच्या नियमानुसार असावी. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं होतं की, भारतातील ट्रक ड्रायव्हर्स हा सार्वजनिक वाहतुकीतील सर्वाधिक दुर्लक्षित विभाग आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत ट्रक चालक काम करत असतात. त्यांच्यावर देशातील जीवनावश्यक आणि इतर वस्तूंच्या पुरवठ्याची जबाबदारी असते. अनेकदा ठरलेल्या तासांपेक्षा जास्त काळ काम करतात. यामुळे त्यांची चांगलीच दमछाक होते. यामुळे अनेकदा महामार्गावर रस्ते अपघात होऊ शकतात. एन2 कॅटगरी म्हणजे ज्या ट्रकचं वजन 3.5 टनाहून जास्त आणि 12 टनापेक्षा कमी असतं. तर एन3 कॅटगरी म्हणजे ज्या ट्रकचं वजन 12 टनापेक्षा अधिक असते.

केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने अधिसूचना जारी केल्यानंतर मंत्री नितीन गडकरी यांनी समाधान व्यक्त केलं आहे. ट्रक चालकांचं काम आणि प्रवास सुखकर करण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचं ठरेलं. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल. तसेच त्यांना लांबच्या पल्ल्यात थकवा जाणवणार नाही. एसी केबिनमुळे व्यवसायिक वाहनांच्या किंमतीत वाढ होईल असं सांगण्यात आहे.

## घरकुलांसाठी एल्गार कष्टकरी संघटनेचा ठिय्या; प्रकल्प अधिकाऱ्यांचे आश्वासन



**■नाशिक। प्रतिनिधी,**

पंचायत समितीकडून आलेले सर्व घरकुल प्रस्ताव तत्काळ मंजूर करून घरकुलांचे बांधकाम करण्याचे लेखी आदेश द्यावेत, यासह इतर प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी एल्गार कष्टकरी संघटनेच्या वतीने आदिवासी आयुक्त कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी कार्यालयाच्या आवारातच चूल मांडत ठिय्या दिला. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर सायंकाळी आंदोलन मागे घेण्यात आले. जिल्ह्यातील पात्र आदिवासी लाभार्थींना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, यासाठी एल्गार कष्टकरी संघटनेच्या वतीने प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्यासोबतही बैठक झाली. त्यांनी आदेश दिला असतानाही पात्र लाभार्थींना शबरी घरकुल योजनेसह अन्य काही योजनांचा लाभ मिळालेला नाही.

## 'धर्मवीर 2' : '...तेव्हा सेन्सॉर आलं होतं आता अधिकार माझ्याकडे', –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**■ठाणे।अनिकेत भंकाळ,**

'धर्मवीर 2' सिनेमाचे निमार्ते मंगेश देसाई यांनी अभिनेते प्रसाद ओक यांच्या धर्मवीर सिनेमाला राज्यातून मोठा प्रतिसाद मिळाला. शिवसेनेत उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात सुरु असलेली धुसपूस, पक्षफुटीचे प्लानिंग सुरु असतानाच हा सिनेमा आल्याने त्याचे अनेक अर्थ लावले जात होते. आता या सिनेमाचा दुसरा भाग येतोय. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाचे विधान केले




आहे.'धर्मवीर' सिनेमाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर आनंद दिघे यांच्या संघर्षमयी जीवनप्रवासाची गाथा उलगडणारा धर्मवीर 2 सिनेमा लवकर सिनेमागृहात येणार आहे. यामध्ये 'साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट' उलगडून सांगितली जाणार असल्याची जाहिरात केली जात आहे. मंगेश देसाई निर्मित आणि प्रवीण तरडे दिग्दर्शित "धर्मवीर - २ साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट" या चित्रपटाच्या शूटींगला सुरुवात झाली आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांचे हिंदुत्व, पक्ष यावर प्रश्न उपस्थित केले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धर्मवीर 2 संदर्भात अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्यातील मुख्यमंत्र्यांच एक विधान चर्चेत आले आहे.

## डहाणूत मुद्रांक विक्री मध्ये अनियमितता प्रकरणी एका विक्रेत्याचा परवाना निलंबित

**■डहाणू ।विशाल पाटील,**

डहाणू तालुक्यातील मुद्रांक विक्रेत्यांकडून मुद्रांक देण्यास टाळाटाळ करणे, अधिक पैशाची मागणी करणे आणि बळजबरी आपल्या दुकानातून मुद्रंकावर मजकूर छापून घेण्याची सक्ती केली जात असल्याचे प्रकरण उजेडात आले आहे.

या प्रकरणी दुय्यम निबंधक यांच्या अहवालानुसार जिल्हाधिकारी यांनी २० नोव्हेंबर रोजी दिलेल्या एका पत्रानुसार एका विक्रेत्याचा मुद्रांक विक्री परवाना तात्पुरता रद्द केला असून एका विक्रेत्यास नोटीस बजावण्यात आली आहे. डहाणू तालुक्यात तीन अधिकृत मुद्रांक विक्रेते असून या विक्रेत्यांकडून नागरिकांना मुद्रांक तसेच कोर्ट फी स्टॅम्प देण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने दुय्यम निबंधक डहाणू यांनी चौकशी करून दिलेल्या अहवालानुसार मुद्रांक विक्रेत्यांच्या कामकाजात अनियमितता आढळून आली असून त्यांच्याकडून कामामध्ये कुचराई केल्याचे आढळून आल्याचे सांगण्यात आले.

